ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक ३१३ • शनिवार दि.१२ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## मराठा आरक्षणासाठी पुन्हा एल्गार;१५ सप्टेंबरला मुंबईकडे कूच!

### मनोज जरांगे पाटील यांची घोषणा



जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईकडे मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. येत्या १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने मराठ्यांचा महासागर निघेल, असे जरांगे पाटील यांनी शनिवारी जाहीर केले. गणपतीची प्रतिष्ठापना करून १५ सप्टेंबरपासून मुंबईच्या दिशेने कूच करण्याचे आवाहन त्यांनी मराठा समाजाला केले आहे.

या मोर्चासाठी आजपासूनच तयारीला लागण्याचे आवाहन करताना जरांगे पाटील यांनी मोर्चाच्या मार्गावरील मुक्कामांची रूपरेषाही जाहीर केली. १५ सप्टेंबर रोजी पाटोदा, १६ सप्टेंबर रोजी श्रीगोंदा-अहिल्यानगर, १७ सप्टेंबर रोजी हडपसर-पुणे आणि १८ सप्टेंबर रोजी खोपोली येथे मुक्काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.दररोज सुमारे १०० किलोमीटर अंतर पार करण्याचे नियोजन असल्याचेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मोर्चा नियोजित वेळापत्रकानुसार पुढे सरकल्यास गणेश विसर्जनापूर्वीच तो मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात राज्य सरकार आणि मुंबई पोलीस यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन शांततेच्या मार्गानेच सुरू ठेवण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी आंदोलकांना केले. दगडफेक, जाळपोळ किंवा कोणत्याही प्रकारची हिंसक कृती करू नका. वाहनांची वाहतूक शिस्तबद्ध आणि शांततेत करा, अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.मुंबईकडे निघालेल्या प्रत्येक मराठा आंदोलकाने आंदोलनाची आचारसंहिता पाळावी. कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. लोकशाही मार्गाने आंदोलन करून आपला हक्क मिळवायचा आहे, असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईच्या दिशेने निघणार असल्याने राज्य सरकारसमोर या आंदोलनाला सामोरे जाण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. मोर्चाचा मार्ग, संभाव्य गर्दी, वाहतूक व्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्था याबाबत प्रशासनाला मोठी तयारी करावी लागणार आहे. त्यामुळे १५ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या मोर्चाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## आम्ही कोणाच्याही विरोधात नाही;ब्रिक्समध्ये पंतप्रधान मोदींचा महासत्तांना थेट संदेश




नवी दिल्ली:भारत मंडपम येथे शनिवारी झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक प्रशासन व्यवस्थेत व्यापक सुधारणांची गरज अधोरेखित करत महासत्तांना स्पष्ट संदेश दिला. आम्ही कोणाच्याही विरोधात नाही; सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे सांगत मोदी यांनी बहुपक्षीय सहकार्याची भारताची भूमिका स्पष्ट केली. विशेषाधिकार आणि सत्तेची पिरॅमिडसारखी रचना बदलून ती समान भागीदारीच्या व्यासपीठात रूपांतरित करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ब्रिक्स शिखर परिषदेच्या उद्घाटन सत्रात पंतप्रधान मोदी यांनी सहभागी देशांच्या प्रतिनिधींचे भारतात स्वागत केले. भारताचे ब्रिक्स अध्यक्षपद लोककेंद्रित आणि मानवतेला प्रथम स्थान देणाऱ्या दृष्टिकोनावर आधारित असल्याचे त्यांनी सांगितले. लवचिकता, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता या चार बाबींना भारताने प्राधान्य दिले असून ब्रिक्सच्या कार्याला सर्वसामान्य नागरिकांशी जोडण्यावर विशेष भर देण्यात आल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले.ब्रिक्स समूहाने गेल्या काळात जागतिक पटलावर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे आता समूहाने निर्माण केलेल्या सहमतीचे रूपांतर प्रत्यक्ष आणि ठोस परिणामांमध्ये करण्याची वेळ आली आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले. सदस्य देशांमध्ये परस्पर आदर, संवाद आणि सहमतीच्या आधारावर पुढे जाण्याची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.जगातील सध्याची व्यवस्था अनेक दशकांपूर्वीच्या परिस्थितीवर आधारित असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी यांनी भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी जागतिक प्रशासन व्यवस्थेत बदल आवश्यक असल्याचे म्हटले. पुढील वीस वर्षांसाठी सत्ता आणि विशेषाधिकारांची पिरॅमिडसारखी रचना बदलून समान भागीदारी, सहकार्य आणि परस्पर विश्वासावर आधारित व्यवस्था उभी करण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणांचा मुद्दा भारताने आक्रमकपणे मांडला आहे. जागतिक निर्णयप्रक्रियेत विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याची भारताची भूमिका ब्रिक्सच्या व्यासपीठावरून पुन्हा अधोरेखित करण्यात आली.ब्रिक्सच्या निर्णयांना केवळ घोषणांपुरते मर्यादित न ठेवता त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे मोदी यांनी स्पष्ट केले. त्यासाठी ब्रिक्समध्ये सातत्य आणि अंमलबजावणी यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. या यंत्रणेमुळे समूहाने सुरू केलेल्या विविध उपक्रमांचा तसेच घेतलेल्या निर्णयांचा सातत्याने पाठपुरावा करता येणार आहे.ब्रिक्सची संस्थात्मक गती आणि कार्यपद्धती कायम राहिली पाहिजे. एकदा निर्णय घेतल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी, प्रगतीचा आढावा आणि पुढील कृती यासाठी प्रभावी यंत्रणा असणे आवश्यक आहे, असेही पंतप्रधानांनी सांगितले.जागतिक दक्षिण सध्या अनेक आर्थिक, सामाजिक आणि भूराजकीय आव्हानांना सामोरे जात आहे. अशा परिस्थितीत ब्रिक्स देशांमधील परस्पर सहकार्य अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे. परस्पर विश्वास, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि ठोस अंमलबजावणीच्या माध्यमातून ब्रिक्सने जागतिक दक्षिणेच्या प्रश्नांना अधिक प्रभावी आवाज देण्याची गरज असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केले.भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात ब्रिक्सला अधिक लोकाभिमुख, परिणामकारक आणि सहकार्यावर आधारित व्यासपीठ बनविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे मोदी यांनी सांगितले. भारताच्या या प्रयत्नांना सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्य देशांचे त्यांनी आभार मानले. जागतिक पातळीवरील बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ब्रिक्सची भूमिका अधिक व्यापक करण्याचा भारताचा प्रयत्न या भाषणातून स्पष्ट झाला.

## अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणाऱ्या दोन जणांना अटक

### ११७ गॅस सिलेंडर जप्त



नांदेड/प्रतिनिधी-धनेगाव परिसरातील एकबालनगरमध्ये अवैधरित्या गॅस रिफिलिंग करणाऱ्या दोन जणांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली असून त्यांच्या जवळून ११७ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक महेश कोरे व पोलीस कर्मचारी बुधवारी नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत गस्त घालीत होते. त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एकबालनगर मधील एका घरामध्ये अवैधरित्या गॅसची रिफिलिंग होत आहे. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार महेश कोरे, सहाय्यक फौजदार दारासिंग राठोड व पोलीस कर्मचाऱ्यांनी एकबालनगरमधील एका घरावर छापा टाकला. त्याठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरमधून इलेक्ट्रीक मोटारीच्या व स्पीअर पंपाच्या साह्याने गॅस काढून तो मोजमाप करुन अवैधरित्या व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये भरुन दिला जात होता. पोलीसांनी अब्दुल मजीद उर्फ बाबा पि. मोहम्मद उस्मान (वय ५८) रा.बिलालनगर, देगलूरनाका,नांदेड, सय्यद सैफअली स.नुरअली (वय ३२) रा.एकबालनगर, धनेगाव, नांदेड या दोघांना अटक केली. पोलीसांनी घटनास्थळावरुन ३ लाख ६८ हजार रुपये किंमतीचे ११७ गॅस सिलेंडर जप्त केले आहेत. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




गेल्या एक महिन्यापासून पाठ फिरविलेल्या पावसाने आज (शनिवार) सकाळपासूनच नांदेड शहर व परिसरात हजेरी लावली आहे.

## वाहेगाव,मार्कंड नदी घाटांवर पोलीसांची कारवाई



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड तालुक्यातील वाहेगाव व मार्कंड परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेती उपसा करणाऱ्या घाटांवर शुक्रवारी नांदेड ग्रामीण पोलीसांनी कारवाई करुन साडेबारा लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांचे सतत अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या विरुध्द कारवाई सुरु आहे. वाहेगाव व मार्कंड या ठिकाणी नदीच्या पात्रातून रेती उपसा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांच्या पथकाने शुक्रवारी वाहेगाव नदी घाटावर छापा टाकला. नदी पात्रातून रेती उपसा करणारे सात तराफे व १४ ब्रास रेतीसाठा असा ४ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. रेती उपसा करणारे मजूर पोलीसांना बघून पळून गेले आहेत. मार्कंड येथेही नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाड टाकली. नदी पात्रातून रेती उपसा करणारे एक इंजीन, आठ तराफे, सोळा ब्रास रेती असा ७ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पोलीसांनी पंचासमक्ष जप्त केलेले तराफे व इंजीन जागेवरच नष्ट केले. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## जरांगे पाटलांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ माहूर कडकडीत बंद



माहूर/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाचे पडसाद शनिवारी माहूर शहरात उमटले. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मराठा क्रांती मोर्चाने दि.१२ सप्टेंबर रोजी माहूर बंदचे आवाहन केले होते. या आवाहनाला शहरातील व्यापारी, व्यावसायिक, दुकानदार, सामाजिक संघटना आणि मराठा समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने माहूर शहर दिवसभर कडकडीत बंद राहिले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने बंदचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच शहरातील बहुतांश दुकाने व व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली. त्यामुळे नेहमी गजबजणारी माहूरची बाजारपेठ दिवसभर शांत होती. बंदच्या माध्यमातून मराठा आरक्षणाच्या मागणीला माहूरकरांनी ठाम पाठिंबा दर्शविला. मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या आंदोलनाची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी आणि मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. विशेषतः कुणबी नोंदीच्या आधारे मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान करावी, अशी मागणी मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी केली. केवळ आश्वासनांवर प्रश्न लांबविण्याऐवजी शासनाने प्रत्यक्ष निर्णय घेऊन मराठा समाजाला न्याय द्यावा, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. माहूर बंदला व्यापारी आणि व्यावसायिकांनी दिलेला प्रतिसाद हा केवळ बाजारपेठ बंद ठेवण्यापुरता मर्यादित नसून मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर समाजाच्या वाढत्या असंतोषाचे प्रतिबिंब असल्याचे मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. शासनाने आता या आंदोलनाची दखल घेऊन आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली. बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात दिवसभर शांतता राहिली. विविध घटकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतल्याने माहूर बंदला व्यापक प्रतिसाद मिळाला.

## रुग्णांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही-आ.बोंढारकर



नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयातील पीआयसीयू विभागातील एसी गेल्या दोन-तीन दिवसांपासून बंद असल्याची माहिती मिळताच तातडीने प्रत्यक्ष रुग्णालयात उपस्थित राहून आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी पाहणी केली.

पीआयसीयू विभागात नवजात बालकांवर उपचार सुरू असताना तापमान नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र एसी बंद असल्याने उकाड्याचा त्रास होत असल्याची तक्रार रुग्णांच्या नातेवाईकांकडून प्राप्त झाली. यावेळी रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत तातडीने एसी दुरुस्त करून कार्यान्वित करण्याचे आदेश दिले.यासोबतच रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अस्वच्छता आणि बेडशीटची अस्वच्छ अवस्था निदर्शनास आली. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना याबाबतही कडक सूचना देत तातडीने स्वच्छता व्यवस्था सुधारण्याचे निर्देश दिले.रुग्णसेवेत हलगर्जीपणा अजिबात खपवून घेतला जाणार नाही. असे आ.आनंदराव बोंढारकर यांनी प्रशासनाला सुनावले. रुग्णालयातील सुविधा, स्वच्छता आणि उपचार व्यवस्था याबाबत यापुढेही नियमितपणे पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा करून घेतल्या जातील. सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हीच माझी प्राथमिकता असेल, असे आ.बोंढारकर यांनी सांगितले आहे.

# तिसरं महायुद्ध:जगाला युद्ध नको बुद्ध हवा



अंकुश शिंगाडे
नागपूर.

जगाला युद्ध नको बुद्ध हवा. लोकं तसेच म्हणतात. कारण लोकं इतिहास वाचतात व इतिहासात कलिंग युद्ध वाचतात. ज्या कलिंग युद्धात जीवीतहानी व वित्तहानी भरपूर झालेली होती. युद्ध... कोणतेही युद्ध का असेना, त्या युद्धात जीवीतहानी व वित्तहानी ठरलेली असते. ती जीवीतहानी व वित्तहानी, त्या त्या देशातील त्या त्या युद्धाच्या तीव्रतेवर अवलंबून असते. युद्धाची तीव्रता जास्त असेल तर जीवीतहानी व वित्तहानी जास्त आणि तीव्रता कमी असेल तर होणारं नुकसान कमी होतं. बुद्ध... बुद्ध आणि युद्धाचा तेवढा फारसा संबंध नाही. परंतु बुद्धानी दिलेले अहिंसा तत्व हे युद्ध टाळण्याचं काम करतं. ज्यातून जीवीतहानी व वित्तहानी होत नाही. म्हणूनच बुद्ध तेवढाच महत्वाचा आहे आणि त्यांनी सांगीतलेल्या विचारानुसार वागणंही तेवढंच महत्वपुर्ण आहे. युद्ध... युद्ध होतं वाईट विचारांनी. जर मनात वर्चस्वाचे, विस्ताराचे, स्वार्थभावनेचे कुविचार आले की बस युद्ध होतं. ज्यातून जीवीतहानी व वित्तहानी होत असते. तसं पाहिल्यास हे एक प्रकाराचं प्रदौषणच आहे. ज्याला विचारांचं प्रदुषण म्हणता येईल. सृष्टी... सुष्टी जगेल तर आपण जगू. थोरांचं म्हणणं. परंतु सृष्टी जगेल कशी? लोकं तर सृष्टीचा विनाशच करु पाहात आहेत.

सृष्टीचा विनाश. होय, सृष्टीचा विनाशच होत असलेला दिसत आहे. त्याचं कारण आहे, प्रदुषण. प्रदुषणाची अलिकडील काळात समस्या वाढलेली आहे. तसं पाहिल्यास मुखत्वे प्रदुषण अनेक प्रकाराचं आहे. ध्वनी, वायू, जल, अन्न, मोबाईल व आपल्या मनातील कुविचार. इत्यादी सर्व प्रकारचं प्रदुषण.प्रदुषण...आपण आज केवळ प्रदुषणाच्याच विळख्यात जगतो आहोत. जलप्रदुषण, वायूप्रदुषण, अन्नप्रदुषण व ध्वनीप्रदूषण, मोबाईलप्रदुषणाणि कुविचारांचे प्रदुषण. या सर्व प्रकारच्या प्रदुषणाच्या व्याधींनी आपल्याला घेरलंय.जलप्रदूषण अर्थात पाण्याचं प्रदुषण. लोकांनी कारखान्यातून निघणारा सांडपाणी नदीत मिसळविलाय. ज्यातून जलप्रदूषण झालं. ज्या जलप्रदूषणानं पाण्यातील तत्सम जीवांना श्वासोच्छ्वासाचा धोका निर्माण झालाय व ते मरतात आहेत. परंतु सध्या तरी त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. लक्ष जात नाही. दुसरं प्रदुषण आहे वायूप्रदुषण. हेही प्रदुषण निर्माण करणारं कारण म्हणजे कारखाना. कारखान्यातून निघणारे विषारी वायू अर्थात सल्फर डाय ऑक्साईड व हायड्रोजन सल्फाईड अति जास्त प्रमाणात निघतात. जे विषारी असतात व ते श्वासोच्छ्वासाद्वारे माणसांच्याच शरीरात नाही तर सजीवांच्या शरीरात जातात. ज्यातून हार्टअटॅक सारखे गंभीर आजार होत असतात. तिसरं प्रदुषण आहे, अन्नप्रदुषण. अलिकडील काळात काही लोकँ जास्त पैसा कमविण्याच्या हेतुतून अन्नही प्रदुषण करु लागलेले आहेत. ती मंडळी वेळेत अन्न तयार होत नाही. हा उद्देश गृहीत धरुन आधीच अन्न बनवून घेतात. त्यानंतर त्याच अन्नाला रसायनं लावून ते अन्न फ्रीज करुन महिनोगणती ठेवतात. जे अन्न खाल्याने आपल्याला महाभयंकर असे आजार होवू शकतात. जसे कॅन्सरसारखे आजार.

प्रदुषणाच्या जगात वावरत असतांना सध्या जसं अन्नप्रदुषण होत आहे. तसंच आता ध्वनीप्रदूषणही होत आहे. डीजेच्या तालावर नाचणारी तरुणाई कितीतरी डेसीबल आवाजात गाणे लावून नाचते, बागडते. परंतु त्या आवाजाचा त्रास हा आबालवृद्धांनाही होत असतो. पशुपक्षांनाही होत असतो. याचा विचारच केल्या जात नाही. ज्यात काही काही प्राण्यांच्या कानाचे पडदे हे लवचिक असतात व ते पडदे अशा विपरीत असलेल्या मोठ्या आवाजाने फाटूही शकतात व कायमचं बहिरेपण येवू शकतं. काही वृद्धांचंही तसंच होतं. वयोमानानुसार त्यांच्याही कानाचे पडदे हे पातळ होतात. ज्यातून अशा प्रकारच्या प्रदुषणाचा त्रास संभवतो.प्रदुषणाच्या रांगेत चवथा व नवीन प्रकार आलेला आहे. तो नवीन प्रकार आहे, मोबाईल प्रदुषण. मोबाईलच्या प्रदुषणात असे असे स्मार्टफोन आले की जे मोबाईल वापरत असतांना त्याचा लोकांना त्रासच होत असतो. काही मोबाईल असेही बनावटीचे आहेत की त्यातून अंधत्व येवू शकतं. शिवाय याच मोबाईलच्या नादात लागून काही लोकँ वेडेही झाले आहेत. काहींचं मानसिक संतुलन ढासळलं आहे, तर काहींना निद्रेच्या समस्याही निर्माण झालेल्या आहेत. पशुपक्षांनाही त्याचा त्रासच होत असून काही पशुपक्षीही या व्याधीच्या लहरी किरणोत्सारातून मरणही पावलेले आहेत.

प्रदुषणाचा आणखी एक प्रकार आहे. ज्याची आपणास कल्पना जरी असली तरी त्याबद्दल आपण अवगत नाही. ते प्रदुषण आहे, विचारप्रदुषण. याला इतिहास सुद्धा आहे.विचारप्रदुषणाला ऐतिहासिक पुरावा देतांना रामायण व महाभारतातील प्रसंगांचा उल्लेख करावासा वाटतो. रामायण काळात रामाचं कार्य सात्विक असतांनाही केवळ मंथराद्वारे विचारांचं प्रदुषण झालं व अख्खं रामायण घडलं. तीच घटना घडली महाभारत काळात. महाभारत काळातही इंद्रप्रस्थमधील भासमान भ्रमण पाहून द्रौपदीचं हसणं, कौरव पुत्र दुर्योधनास खललं व त्यानं त्याचा विपर्यास करीत स्वतःच्या रागावर नियंत्रण न ठेवता, त्या घटनेचा बदला घेण्याचा विचार केला. म्हणजेच त्याच्या विचाराचं प्रदुषण झालं व महाभारत घडलं. पुढं याच इतिहासाची पुनरावृत्ती झाली व विचारांचं प्रदुषण सुरुच राहिलं. अनेक राजे सत्तेवर आले व अनेक गेले. काही काही राजांची विचारांच्या प्रदुषणातूनच हत्या झाली. मग राजा दाहिरचा काळ असो वा पृथ्वीराज चव्हाणचा काळ असो, अलाऊद्दीन खिलजीचा काळ असो वा मुघल साम्राज्याचा काळ असो, शिवाजी महाराजांचा काळ असो वा इंग्रजांचा काळ असो, अन् नुकतेच झालेलं पहिलं महायुद्ध असो वा दुसरं महायुद्ध. ह्या सर्व गोष्टी विचारांच्या प्रदुषणातून घडलेल्या आहेत.

पहिलं महायुद्ध. या महायुद्धात प्रिन्स बिस्मार्क हा जर्मनीचा चॅन्सेलर होता. त्यानं कुटनीतीची व संशयास्पद राजनीती केली. ज्यावेळेस संबंध देशात शांतता होती. त्यावेळेस बिस्मार्क हा गुप्तपणे इतर देशांची भेट घेत असून गुप्तपणे वार्तालाप करीत असे. ज्यातून वाटाघाटी होत व पहिलं महायुद्ध निर्माण होण्याला तोच जबाबदार ठरला.पहिलं महायुद्ध बंद झाल्यानंतर राष्ट्रसंघ नावाची एक जागतिक संघटना निर्माण झाली. ज्या संघटनेनं युद्ध टाळायचं ठरवलं गेलं. परंतु ही संघटना नाममात्र ठरली व जर्मनीतच हिटलरचा उदय झाला. ज्यानं आपल्यातील विचार प्रदुषणानं अगदी जागतिक स्तर नाशवला व दुसरं महायुद्ध झालं.दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती १९४२ ला झाली व त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघ नावाची आणखी एक जागतिक स्तरावरील संघटना उभी राहिली. परंतु सध्याच्या परिस्थितीत त्या संघटनेवर अमेरिकेचं वर्चस्व आहे व अमेरिकाच सध्या आपलं वर्चस्व सिद्ध करण्यासाठी इतर देशांवर दबाव आणू पाहात आहे. ज्यातून तिसरं महायुद्ध घडून येण्याची चिन्हं दिसत आहेत. शिवाय आपलं वर्चस्व सिद्ध करण्यासाठी या अमेरिकेनं इस्रायलला पाठींबा देवून इराण व इस्रायल युद्धात उडी घेतली. ज्याचा परिणाम असा की इराणही आता इस्रायलच नाही तर अमेरिकेलाही दबायला तयार नाही. कारण इराणला प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या चीन मदत करतोय. ज्या चीनला अमेरिकेचं वर्चस्व मान्य नाही. अन् चीन हा देश जागतिक महासत्ती बनत चालला असल्यानं व त्याला त्या रस्त्यात अमेरिकाच अडथळा ठरु पाहात असल्यानं जागतिक राजकारणात जगात दोन स्तर पडलेले आहेत. जे दोन स्तर संभावीत तिसऱ्या महायुद्धाची भीती दर्शवीत आहेत. यामध्ये समजा तिसं महायुद्ध झालंच. तर बरंच काही होईल. जागतिक राजकारणातील अनेक छोटे छोटे देश नष्टच होतील. यात शंका नाही.

जगात पहिलं महायुद्ध म्हणून ज्या युद्धाला गणलं जातं. त्यावेळेस अण्वस्त्राचा तेवढ्या प्रमाणात शोध न लागल्यानं त्या युद्धाची तेवढी झळ पोहोचलेली नव्हती. परंतु युद्धातून किती भयावह स्थिती निर्माण होते. हे जगानं दुसऱ्या महायुद्धात अनुभवलं. ज्यातून जगाचं अपरीमीत नुकसानच झालं. कारण दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेनं जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणुबॉम्ब टाकून त्यांना नष्ट केलं होतं. ज्याचा परिणाम दीर्घकाळपर्यंत जपाननं अनुभवला. शिवाय वित्तहानी व मनुष्यहानीही भरपूरच झाली होती. पहिलं व दुसरं महायुद्ध म्हणजे एक प्रकारची वर्चस्वाचीच लढाई होती. हिंसा चांगली नसते. हे सांगत राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ यांनी बराच प्रयत्न केला युद्ध रोखण्याचा. परंतु घडलं उलटच. आजही संयुक्त राष्ट्रसंघ तोच प्रयत्न करीत आहे. परंतु त्यात ते यशस्वी ठरलं नाही. अन् इराण इस्रायल युद्ध सुरु झालं. ज्यात अमेरिकाही युद्धात पडली. आताचं सुरु झालेलं इराण आणि इस्रायल युद्ध. ही देखील इस्रायलची अन् खास करुन त्याचा मित्र देश असलेल्या अमेरिकेच्या वर्चस्वाचीच लढाई आहे. अन् याही लढाईत अमेरिका माघार घ्यायला तयार नाही आणि इराणही मागे हटायला तयार नाही. त्यातच दोन्ही देश एकमेकांशी असलेल्या हितसंबंधी देशांची युद्धसामग्री व इतर संबंधीत बाबींची मदत घेत आहेत. शिवाय कधीकधी शस्त्रसंधी होते. परंतु हे सीजफायर काही दिवस चालतं. तद्नंतर दोन्ही देशांपोकी एखादा देश अचानक हमला करतो. ज्यातून युद्ध उद्भवतं. समजा असंच जर सुरु राहिलं तर याच वर्चस्वाच्या लढाईतून बाकीचेही देश हातसफाई करुन घेण्यासाठी हितंसंबंधी देश हितसंबंधी देशांना नक्कीच मदत करु शकतील. ज्यातून दुसरं महायुद्ध जसं झालं. तसंच महायुद्ध पुन्हा होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मात्र हे होवू नये म्हणून हितसंबंधी देशांनी यात आपसी चर्चा करावी.

होय, मान्य आहे की अमेरिका सर्वश्रेष्ठ आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की इतर लहान लहान देश कमजोर असावेत? इराणही तेच दाखवलं. दाखवलं की इतर लहान लहान देशही तेवढेच महत्वाचे आहेत व तेवढे कमजोरही नाहीतच. मात्र तिसरं महायुद्ध जर झालं तर त्याची झळ ही सर्वच जागतिक देशांना दुसऱ्या महायुद्धाच्या तुलनेत जबर बसणार आहे. कारण सन १९३९ ला जे दुसरं महायुद्ध झालं. त्यावेळेस जेवढ्या अण्वस्त्राचा शोध लागला नव्हता. यावेळेस त्यापेक्षा कितीतरी पटीनं अणवस्त्र शोधली गेलेली आहेत व त्यानुसार जगाचा विध्वंश होणार आहे. हे निश्चित आहे. त्यामुळंच तिसरं महायुद्ध टाळणं गरजेचं आहे आणि तिसरं महायुद्ध टाळायचं असेल तर इराण, इस्रायल युद्ध थांबणं गरजेचं आहे. त्यामुळंच ते थांबविण्यासाठी जागतिक स्तरावर चर्चा होणे गरजेचे आहे. ती चर्चा व्हावी व अमेरिका जरी जागतिक स्तरावरील मोठा देश असला तरी त्यांच्यावर दबाव आणला जावा. जेणेकरुन इराण व इस्रायलचं युद्ध थांबेल. त्याचबरोबर जगातही शांती नांदेल. कारण जशी देशाला युद्ध नाही तर बुद्धाची गरज आहे. तशीच जगालाही युद्ध नाही तर बुद्धाचीच गरज आहे. यात शंका नाही.

# निचपूरच्या सरपंच कोमलताई तिळेवाड पदावरुन अपात्र

## ग्रामसभा व मासिक सभा नियमानुसार न घेतल्याचा ठपका;जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा आदेश

किनवट/प्रतिनिधी-महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ७ व ३६ अन्वये ग्रामसभा व ग्रामपंचायतीच्या विहित सभा नियमानुसार न घेतल्याच्या प्रकरणात निचपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच कोमलताई संतोष तिळेवाड यांना उर्वरित कालावधीसाठी सरपंच पदावर राहण्यास अनर्ह ठरविण्याचा आदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी ७ सप्टेंबर २०२६ रोजी दिला आहे. निचपूरचे उपसरपंच बालाजी उखंडराव डोईफोडे यांनी सरपंच तिळेवाड यांनी पदभार सांभाळल्यापासून नियमानुसार ग्रामसभा व मासिक सभा घेतल्या नसल्याचा आरोप करीत जिल्हाधिकाऱ्यांकडे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ व ३६ अंतर्गत विवाद अर्ज दाखल केला होता. या प्रकरणात वादीतर्फे ड.एन.जे.काकडे यांनी बाजू मांडली.

**ग्रामसभा व मासिक सभा न घेतल्याचा आरोप :** विवाद अर्जात, ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ नुसार प्रत्येक आर्थिक वर्षात विहित पद्धतीने किमान चार ग्रामसभा घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच कलम नुसार ग्रामपंचायतीच्या नियमित बैठका घेणे आवश्यक असतानाही संबंधित कालावधीत सभा घेण्यात कसूर झाल्याचा दावा करण्यात आला. वादीच्या म्हणण्यानुसार, ऑक्टोबर २०२२ पासून सरपंचपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ग्रामसभांचे व मासिक सभांचे नियोजन व आयोजन नियमाप्रमाणे करण्यात आले नाही. विशेषतः नोव्हेंबर २०२२ मधील ग्रामसभा तसेच काही मासिक सभा घेण्यात आल्या नसल्याचा आरोप करण्यात आला. या पार्श्वभूमीवर सरपंचांना उर्वरित कार्यकाळासाठी पदावरून अनर्ह ठरविण्याची मागणी करण्यात आली होती.

**गटविकास अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालाला महत्त्व :** या विवाद अर्जावर सुनावणी करताना जिल्हाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी, किनवट यांचा चौकशी अहवाल मागविला. गटविकास अधिकाऱ्यांनी जा.क्र. पसकी/ग्रापं/८०५/२०२६, दिनांक ११ मार्च २०२६ रोजी अहवाल सादर केला असून तो २५ मे २०२६ रोजी प्राप्त झाला. या अहवालानुसार, कोमलताई संतोष तिळेवाड यांची ऑक्टोबर २०२२ मध्ये निचपूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी निवड झाली होती. उपलब्ध अभिलेखांच्या आधारे ७ ऑक्टोबर २०२२ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत कलम ७ अन्वये आवश्यक असलेल्या ग्रामसभा झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. तसेच ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ या महिन्यांतील मासिक सभांबाबत नोटीस व इतिवृत्त लिहिलेले असले तरी संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्याने त्या सभा नियमातील तरतुदींनुसार झाल्याचे ग्राह्य धरता येत नसल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले.

**सरपंचांची बाजूही मांडण्यात आली :** दरम्यान, प्रतिवादी सरपंचांच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत लेखी व तोंडी युक्तिवाद करण्यात आला. ग्रामपंचायतीचे प्रशासन हे केवळ सरपंचावर अवलंबून नसून सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व प्रशासन यांच्या सामूहिक सहभागातून चालते, असा युक्तिवाद करण्यात आला. ग्रामसेवकांची अनुपलब्धता, वारंवार बदल, सदस्यांचे असहकार्य तसेच ग्रामपंचायतीतील तणावपूर्ण परिस्थिती यामुळे सभांच्या कामकाजावर परिणाम झाल्याचे प्रतिवादींच्या बाजूने सांगण्यात आले. उपसरपंच म्हणून वादीचीही ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करण्याची जबाबदारी होती, असा दावा करण्यात आला. काही प्रसंगी सभा घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले, सदस्यांनी नोटिसा स्वीकारण्यास नकार दिला, उपस्थिती नोंदवहीवर स्वाक्षरी केली नाही किंवा सभेच्या कामकाजात गोंधळ झाला, असेही प्रतिवादींकडून नमूद करण्यात आले. ग्रामसेवकांच्या गैरहजेरीमुळे ग्रामपंचायतीच्या दैनंदिन प्रशासनावर परिणाम झाल्याचा युक्तिवादही करण्यात आला.

**पुरावे सादर करण्याचा दावा :** प्रतिवादींकडे ग्रामसभा नोटिसा, उपस्थिती नोंदवही, इतिवृत्त पुस्तिका, माहिती अधिकारातून प्राप्त कागदपत्रे, ग्रामसेवकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलेले अर्ज तसेच काही व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. या सर्व पुराव्यांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी प्रतिवादींच्या वतीने करण्यात आली. तसेच तक्रार अपूर्ण व निवडक घटनांवर आधारित असून ग्रामपंचायतीची तत्कालीन प्रशासकीय परिस्थिती विचारात घेतलेली नाही, असा बचाव करण्यात आला. त्यामुळे विवाद अर्ज फेटाळून सरपंचांविरुद्ध कोणतीही प्रतिकूल कारवाई करू नये, अशी विनंती करण्यात आली.

**जिल्हाधिकाऱ्यांचा निष्कर्ष :** या प्रकरणात १६ जून, ७ जुलै आणि २१ जुलै २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्षांचे म्हणणे नोंदवून प्रकरण आदेशासाठी ठेवण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी विवाद अर्ज, गटविकास अधिकारी, किनवट यांचा चौकशी अहवाल तसेच प्रतिवादींचा युक्तिवाद यांचा विचार केला. मात्र, सरपंचांनी त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने विहित ग्रामसभा व मासिक सभा घेतल्याचे पुरक दस्तऐवजी पुरावे सादर केले नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले. उपलब्ध अभिलेख आणि गटविकास अधिकाऱ्यांच्या अहवालावरून ७ ऑक्टोबर २०२२ ते २५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत कलम ७ अन्वये आवश्यक ग्रामसभा तसेच ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ मधील मासिक सभा नियमाप्रमाणे घेतल्या नसल्याचा निष्कर्ष जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नोंदवत वादी बालाजी डोईफोडे यांचा विवाद अर्ज मंजूर केला आणि कोमलताई तिळेवाड यांना निचपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच पदावर उर्वरित कालावधीसाठी राहण्यास अनर्ह ठरविले हे विशेष.

# राज्य महोत्सवात महावितरणकडून होणार हरितऊर्जा,विद्युत सुरक्षा व बचतीवर जनजागृती

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून घोषीत करण्यात आला आहे. शासनाच्या विविध विभागाद्वारे गणेशोत्सवात समाजजागृतीपर कार्यक्रम होणार आहेत. महावितरणच्या नांदेड परिमंडलातील नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातही व्यापक प्रमाणात गणेशोत्सव हा राज्यमहोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार असून त्यात वीज सुरक्षा, हरित ऊर्जा आणि वीज बचतीच्या संकल्पनेवर भर देण्यात येणार आहे.

१४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात परिमंडलातील तीनही जिल्ह्यात हरित उर्जा, विद्युत सुरक्षा आणि वीज बचत या संकल्पनेवर जनजागृती होईल. महोत्सवाची सुरूवात १५ सप्टेंबर या अभियंता दिनाने होईल. अभियंता दिनी सर्व अभियंत्यांचा व त्यांच्या रचनात्मक कार्याचा सन्मान करण्यात येईल. त्या सोबतच महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी आणि कर्मचारी त्या त्या भागातील नामांकित शाळा व महाविद्यालयात जाऊन समारंभपूर्वक हरित ऊर्जा, विद्युत सुरक्षा आणि वीज बचत या विषयांवर विद्यार्थ्यांचे प्रबोधन करतील. शिवाय जिल्हा, तालुका व गावपातळीवरील गणेश मंडळाच्या मंडपातही जाऊन जनजागृती करण्यात येणार आहे.हतितऊर्जा विकासाला प्राधान्य देणारी प्रधानमंत्री मोफत सौरघर योजना, शेतीपंपासाठीची मागेल त्याला सौरकृषीपंप योजना, शेतीला दिवसाच्या कालावधीत वीज पुरवठ्यास महत्वपूर्ण ठरणारी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असणारी स्मार्ट सौरघर योजनांचा जागर करणारे बॅनर्स, होर्डीग्ज, पॉम्पलेट गणेश महोत्सवात उपलब्ध होणार आहेत. त्या शिवाय वीज सुरक्षेसाठी काय करावे आणि काय करू नये यासंबधीची माहिती विविध गणेश मंडळाच्या मंडपा- मंडपातून देण्यात येणार आहे.गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यासंदर्भात राज्य शासनाने शासनाच्या इतर विभागांसह महावितरणलाही त्यासंबंधीचे दिशा निर्देश परिपत्रकातून देण्यात आलेले आहे. त्यानुसार महावितरणच्या नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर, परभणी, सेलू आणि हिंगोली विभागाकडून जनजागृती करण्यासाठी कार्यक्रमांची आखणी करण्यात आलेली आहे.

# दिव्यांगांच्या हक्कांवरून जांबमध्ये प्रशासन धारेवर; लेखी उत्तर न दिल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

मुखेड/प्रतिनिधी-शासकीय योजना, विविध सवलती तसेच ग्रामपंचायतीच्या निधीतील दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप करत जांब (बु.) येथे दिव्यांग बांधवांनी प्रशासनाला जाब विचारला. येत्या १५ दिवसांत दिव्यांग कल्याण योजनांबाबत समाधानकारक लेखी खुलासा करून ठोस कार्यवाही न केल्यास ग्रामपंचायत तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

स्थानिक ग्रामपंचायत सभागृहात दिव्यांग, वृद्ध, निराधार मित्र मंडळ महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटील (कुंचेलीकर) यांच्या अध्यक्षतेखाली परिसरातील दिव्यांग बांधवांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी दिव्यांगांच्या प्रश्नांकडे प्रशासनाकडून होत असलेल्या कथित दुर्लक्षाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.बैठकीत ग्रामपंचायतीला प्राप्त होणाऱ्या निधीपैकी दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचा प्रत्यक्ष विनियोग कुठे व कसा करण्यात आला, याचा हिशेब मागण्यात आला. तसेच दिव्यांग घटकांसाठी मंजूर घरकुलांचे प्रस्ताव, रोजगार हमी योजनेतील सहभाग आणि ५ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी याबाबतही प्रशासनाकडून स्पष्ट माहिती मागण्यात आली.दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत प्रमाणपत्र नोंदणी, घरोघरी मतदानाची सुविधा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे का, याबाबतही बैठकीत प्रश्न उपस्थित करण्यात आले. दिव्यांगांना होणारा मानसिक व शारीरिक त्रास रोखण्यासाठी प्रशासनाने कोणती ठोस पावले उचलली, याचाही जाब विचारण्यात आला.जिल्हाधिकारी स्तरावर आतापर्यंत १२ बैठका व एका सुनावणी होऊनही दिव्यांगांचे अनेक मूलभूत प्रश्न अद्याप कागदावरच प्रलंबित असल्याबद्दल बैठकीत संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या. आता आश्वासने नकोत, हक्क हवा आहे, असा आक्रमक सूर यावेळी उमटला.प्रशासनाने येत्या १५ दिवसांत उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर समाधानकारक लेखी खुलासा करून प्रत्यक्ष कार्यवाही केली नाही, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

# शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी-आ.राजेश पवार

उमरी/प्रतिनिधी-चार महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे नायगाव विधानसभा मतदारसंघातील उमरी, धर्माबाद व नायगाव इत्यादी तालुक्यातील खरीप पिके करपून गेली आहेत. या परीस्थितीची दखल घेऊन आ. राजेश पवार यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना पत्र देऊन नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी केली आहे.



शेतक-यांनी मोठ्या आशेने शेतीची मशागत करून, बियाणे, खते, औषधी, निंदणी व मजुरीवर मोठा खर्च केला आहे. परंतु पावसाअभावी हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भिती निर्माण झाली आहे. या परीस्थितीची तलाठी, मंडळाधिकारी, व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यां मार्फत प्रत्येकक्ष शितीची पहाणी करून झालेल्या नुकसानीची नोंद करण्याची मागणीही आ.राजेश पवार यांनी केली आहे. या दरम्यान किती गावात किती हेक्टर किती क्षेत्र बाधीत झाली आहेत. याचे पंचनामे कधी सुरू होणार आणि मदतीसाठी प्रशासनाची कारवाई काय आहे. याची माहिती जिल्हाधिकारी कडे मागविण्यात आली आहे. शेतकरी संकटात असताना त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू असे आ.राजेश पवार यांनी स्पष्ट केले आहे

# बालकलाकाराचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

उमरखेड/प्रतिनिधी-गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना उमरखेड तालुक्यातून एका चिमुकल्याने पर्यावरण संवर्धनाचा मोठा संदेश दिला आहे. बाप्पा येणार! पण यावेळी एक वेगळा संदेश घेऊन! या संकल्पनेतून बालकलाकार ध्रुवा राठोड याने तयार केलेल्या विशेष शॉर्ट फिल्म सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.

भक्ती आणि पर्यावरण यांची सुंदर सांगड घालणारी ही शॉर्ट फिल्म केवळ मनोरंजन नसून एक जनजागृती मोहीम आहे. मातीचा बाप्पा निसर्गाची खरी पूजा हा या उपक्रमाचा मुख्य गाभा आहे.भक्तीच्या नावाखाली निसर्गाची हानी हेच का आपलं खरं प्रेम? असा थेट आणि संवेदनशील सवाल या फिल्ममधून ध्रुवाने उपस्थित केला आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण आणि निसर्गाची होणारी हानी रोखण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तीचा आग्रह त्याने धरला आहे.तालुक्यातील मेट या छोट्याशा तांडावस्तीतील ज्ञानेश्वर चव्हाण (मेटकर) यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण संकल्पना साकारण्यात आली आहे.मातीमध्ये परतणं म्हणजे शेवट नाही तर नव्या जीवनाची सुरुवात! या भावनिक संदेशातून शाडू मातीच्या मूर्तीचे आणि निसर्गाशी असलेल्या आपल्या अतूट नात्याचे सुंदर वर्णन या फिल्ममध्ये करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा केवळ उत्सव न राहता भक्ती, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा संगम व्हावा, हा या उपक्रमामागील खरा उद्देश आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कॉ.येचुरी यांच्या स्मृतिदिनी अभिवादन सभा संपन्न



नांदेड/प्रतिनिधी-माकपचे माजी महासचिव,ज्येष्ठ विचारवंत व संसदपटू कॉ.सीताराम येचुरी यांच्या द्वितीय स्मृतिदिनी,नांदेड येथील महात्मा फुले स्मारक येथे अभिवादन सभा घेण्यात आली.

राज्यसभेतील आपल्या कारकिर्दीत त्यांनी कामगार, शेतकरी, आदिवासी तसेच वंचित घटकांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली. त्यांच्या भाषणांमध्ये आकडेवारी, इतिहास आणि मार्क्सवादी विचारांचा प्रभावी संगम दिसून येत असे. देशातील धर्मनिरपेक्ष व पुरोगामी शक्तींना एकत्र आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. लोकांच्या एकजुटीशिवाय देश वाचणार नाही हा कॉ. येचुरी यांनी दिलेला विचार आजच्या परिस्थितीत अधिक महत्त्वाचा असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले. त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन धर्मनिरपेक्षता, लोकशाही, सामाजिक न्याय आणि जनतेच्या हक्कांसाठीचा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. अभिवादन सभेस कॉ. विजय गाभणे, हम भारत के लोगचे समन्व्यक श्याम निलंगेकर, कॉ.गंगाधर गायकवाड, कॉ.उज्वला पडलवार, डॉ. आदिनाथ इंगोले, प्रा.प्रल्हाद हिंगोले, जमसंच्या कॉ.लता गायकवाड, सीटू राज्य कमिटीच्या सभासद कॉ.करवंदा गायकवाड, एसएफआयच्या जिल्हा सचिव मीना आरसे, ॲड. प्रशांत कोकणे, पवन जागडमवार, डीवायएफआयचे तालुका अध्यक्ष कॉ.जयराज गायकवाड, कॉ.प्रदीप महाजन, कॉ. दिगंबर घायाळे, मंगेश वट्टेवाड, अंबादास भंडारे, सुभाषचंद्र गजभारे, राहुल नरवाडे, चंद्रकांत लोखंडे, अनिल सिरसाट आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्यसेवेला बळकटी

## स्त्रीरोग व बालरोग तज्ज्ञांसह कक्ष अधीक्षकांची नियुक्ती

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात तातडीने आवश्यक पदांची भरती करून रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करावे, या मागणीसाठी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार आणि गजानन कोटलावार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला आता सकारात्मक यश मिळाले असून ग्रामीण रुग्णालय कुंडलवाडी येथे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. शिवकुमार सावरगावे आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत सोनकांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच कक्ष अधीक्षकाचीही नियुक्ती झाली आहे.

कुंडलवाडी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय सेवा सुरळीत करण्यासाठी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार व गजानन कोटलावार यांनी आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवरच दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि उपचारासाठी नांदेड किंवा इतर शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी त्यांनी प्रशासनाकडे सातत्याने मागणी लावून धरली.या पाठपुराव्यामुळे ग्रामीण रुग्णालय कुंडलवाडी येथे एमबीबीएस, एमडी (बालरोग) डॉ. अतुल कदम यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतरही रुग्णालयातील इतर आवश्यक पदे तातडीने भरण्याबाबत पाठपुरावा सुरूच ठेवण्यात आला. काही दिवसांपूर्वी मुंबई येथे आरोग्य संचालकांची पुन्हा भेट घेऊन नियुक्तीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी लवकरच कायमस्वरूपी तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती केली जाईल, अशी ग्वाही देण्यात आली होती.या पार्श्वभूमीवर आता एमबीबीएस, एमएस (स्त्रीरोग) डॉ. शिवकुमार सावरगावे यांची स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून, तर एमबीबीएस, डीसीएच डॉ. प्रशांत सोनकांबळे यांची बालरोगतज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच कक्ष अधीक्षकाचीही नियुक्ती झाल्याने रुग्णालयाच्या प्रशासकीय आणि वैद्यकीय कामकाजाला आवश्यक बळ मिळणार आहे. ग्रामीण रुग्णालयात आणखी आवश्यक असलेल्या विविध पदांची नियुक्ती लवकरच करण्यात येणार असून रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्याची ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे कुंडलवाडी परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.या निर्णयाबद्दल कुंडलवाडी शहरासह परिसरातील नागरिकांमधून समाधान आणि आनंद व्यक्त होत आहे.




# बाफना परिसरातील खुनाच्या घटनेतील फरार आरोपीस अटक



नांदेड/प्रतिनिधी-बाफना परिसरातील कार बाजार समोर एका महिन्यापूर्वी मंगल गवळे या युवकाचा डोक्यात दगड घालून निर्घृणपणे खून करण्यात आला होता. या घटनेतील फरार आरोपीस इतवारा पोलीसांनी माळटेकडी ब्रीज जवळून अटक केली आहे.

बाफना परिसरातील कार बाजार समोर दि.७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री मंगल शंकर गवळे (वय ३२) रा.लोंढेसांगवी, ता.लोहा या इसमाचा अज्ञात तीन जणांनी डोक्यात दगड घालून खून करण्यात आला होता. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात अज्ञात तीन आरोपी विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेतील एका आरोपीस अटक करण्यात आली होती. परंतु दोन आरोपी गेल्या एक महिन्यापासून फरार आहेत. या घटनेतील एक आरोपी राजू रतन जोंधळे (वय ४५) रा. वडेपुरी हा माळटेकडी ओव्हरब्रीज भागात असल्याची माहिती इतवारा पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, पोलीस निरिक्षक कैलासे यांच्या नेतृत्वाखाली फौजदार जळबाजी गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी शनिवारी माळटेकडी ओव्हरब्रीज खालील चहाच्या दुकानासमोर सापळा रचून राजू जोंधळे यास अटक केली आहे.

## बस प्रवासात महिलेचा सोन्याचा हार लंपास

नांदेड/प्रतिनिधी-एसटी महामंडळाच्या बसमधून प्रवास करीत असताना एका महिलेच्या पर्समधून सोन्याचा हार अज्ञात दोन महिलांनी लंपास केल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे.

छाया उत्तमराव निदानकर (वय ६१) रा.नायगाव ह्या शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास चंदासिंग कॉर्नर येथुन एसटी महामंडळाच्या बसमध्ये चढल्या होत्या. बसमध्ये प्रवास करीत असतांना अज्ञात दोन महिलांनी छाया निदानकर यांच्या पर्समधील १ लाख ६२ हजार रुपये किंमतीचा सोन्याचा हार चोरुन नेला आहे. छाया निदानकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात दोन महिलेविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यार्थ्यांनी साकारले मातीपासून इको-फ्रेंडली गणपती

कंधार/प्रतिनिधी-रवींद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा, कंधार येथे विद्यार्थ्यांसाठी मातीपासून श्री गणेशाची मूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आकर्षक व सुबक इको-फ्रेंडली गणेशमूर्ती तयार केल्या.



या कार्यशाळेचे उद्घाटन कंधारचे प्रसिद्ध चित्रकार सावळाराम कुरुडे पेंटर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. विजय यन्नावार यांनी विद्यार्थ्यांना मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याची पद्धत, त्यातील बारकावे आणि कलात्मकता याबाबत मार्गदर्शन केले. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध आकारांच्या सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. त्यामुळे शाळेच्या परिसरात चैतन्यमय व कलात्मक वातावरण निर्माण झाले होते. कार्यशाळे अंतर्गत घेण्यात आलेल्या गणेशमूर्ती बनविण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक नागेश शिवाजी निलेवाड, द्वितीय क्रमांक अंजली दाऊ चोपवाड, तर तृतीय क्रमांक योगेश्वरी कमलेश टेंभुर्णेवार यांनी मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यकर्ते दिग्विजय कांबळे यांच्या वतीने बक्षीस व प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात आली. यावेळी पत्रकार मयूर कांबळे, पत्रकार शुभम केंद्रे तसेच संस्थेचे सचिव गंगाप्रसाद यन्नावार यांची उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुभाष मुंडे यांच्यासह सहशिक्षक रोहिदास सूर्यवंशी, विश्वदीप हनुमंते, एकनाथ तिडके, शेख यास्मिन, मंजुषा यन्नावार आणि तरकेश तपासे यांनी परिश्रम घेतले.

## वीज तारेचा शॉक लागून इसमाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-शेतात तुटून पडलेल्या वीजेचा तारेचा शॉक लागून एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी बिलोली तालुक्यातील मौजे डोनगाव शिवारात घडली आहे. मधुकर गंगाधर कानोले (वय ४०) रा.डोनगाव (खु.) हे शुक्रवारी सकाळी शेतात काम करीत असतांना विद्युत तारा तुटून खाली पडल्या होत्या. तारेचा शॉक लागल्याने मधुकर कानोले यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी रामतीर्थ पोलीस ठाण्यात अकस्मीक मृत्यू म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला.

# दुष्काळाच्या झळा,तरी पोळ्याचा जल्लोष; बळीराजाने सर्जा-राजाप्रती जपली कृतज्ञता

किनवट/प्रतिनिधी-कोरड्या दुष्काळाची संकेत असतांनाही त्याची तमा न बाळगता बळीराज्याचा पोळासणातला उत्साह शिगेला पोहोचलेला दिसून आला. बोधडी बु. येथील पोळासणाचा मान कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील यांच्या घराण्याकडे आहे. हनुमान मंदिर प्रदक्षिणा करण्यापूर्वी मानाचे तोरण तोडण्याचा मान मुंडे घराण्याकडे असल्याने सर्व विधीपूर्ण करून सर्जा-राजाची पहिली त्यांची बैलजोडी प्रदक्षिणेला निघाल्यानंतर बळीराजांच्या बैलजोड्या फिरल्या. गावोगावी पोळासणाचा मान वारसा हा एका घराण्याकडे परंपरागत चालत आलेला आहे. तालुक्यात पोळासण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला हे विशेष.



यावर्षी खरीप हंगामातील पावसाचे प्रमाण तुलनात्मक दृष्ट्या अत्यंत अत्यल्प झाले आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावली आहे. खळखळा वाहणारे नाले कोरडेठाक पडले आहेत. विहीर, बोअरवेल मधील पाण्याचा स्रोत चिंताजनक बनला आहे. तर दुसऱ्या बाजूने अवर्षणग्रस्त परिस्थितीचा दूरगामी दुष्परिणाम शेतातील उभ्या पिकांवर प्रकर्षाने जाणवलाय. बळीराज्याच्या आता हाती येणाऱ्या सोयाबीन सारख्या रोखड पीकांवर रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढला जमिनीतील ओलाव्याअभावी शेंगा पोचट झाल्या त्याचा अनिष्ट परिणाम उत्पादनावर होणार आहे.अशा नैसर्गिक प्रकोप परिस्थितीला बाजूला सारून बळीराजाने पोळासनावरचा आनंद ढळू दिलेला नाही हे पहायला मिळाले. बळीराज्याचा सच्चा साथी हा बैल आहे. प्रगत व तंत्रज्ञानाच्या प्रवाहकाळात बैलजोडीची संख्या त्या तुलनेत नगण्य दिसते, त्याला कारणही तसेच. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे जमिनीचे तुकडे पडले. थोड्याशा जमिन कास्तसाठी बैलजोडी परवडेना म्हणून पुर्वीच्या आणि आताच्या काळाची समिक्षा केल्यास बैलजोडीचे प्रमाण समजेल. तरी सुद्धा बळीराजा पोळा सणाच्या दिवशी बैलांच्या अथक परिश्रमाच्या उत्तराईदाखल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नतमस्तक होऊन, बैलांचे औक्षण करून पुरणपोळीचा नैवेद्य भरवतात हे उल्लेखनीय म्हणता येईल.

## टि.सी.हरवली आहे

माझी अक्षता देवानंद वाघमारे ५ वी पासची टि.सी.व इतर कागदपत्रे कुरुळा ते कंधार या मार्गावर प्रवास करत असताना येथे हरवली आहेत. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता
**अक्षता देवानंद वाघमारे**
रा.मोहिजा (परांडा) ता.कंधार जि.नांदेड
मो क्रं.९३७३६२९२०३

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३०/२०२६
(CNR No.MHND10-00-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | गंगाबाई भ्र.संभाजीराव गजरे | वय-६२ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | अर्चना भ्र.संतोष गजरे | वय-३५ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | समीक्षा पि.संतोष गजरे | वय-१५ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | श्रावणी पि.संतोष गजरे | वय-१३ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ५ | श्रेया पि.संतोष गजरे | वय-१० वर्षे | धंदा-शिक्षण |
| ६ | श्रुती संतोष गजरे | वय-०८ वर्षे | धंदा-शिक्षण |

अज्ञान अर्जदार नं.३ ते ६ ची अ.
पा.क.आई अर्चना भ्र.संतोष गजरे
सर्व रा.कौठा ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचा मुलगा व अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३ ते ६ यांचे वडिल नामे संतोष संभाजी गजरे हे होते. ते दिनांक १०/१०/२०२५ मौजे कौठा, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदाराचे म्हणणे आहे की संतोष संभाजी गजरे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत संतोष संभाजी गजरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत संतोष संभाजी गजरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१६/१०/२०२६

आज रोजी दि.०२/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३३३/२०२६
(CNR No.MHND10-001128-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रंगनाथ पि.दशरथ मोरे | वय-५८ वर्षे | धंदा-मजुरी |
| २ | चंद्रकांत पि.रंगनाथ मोरे | वय-३५ वर्षे | धंदा-मजुरी |
| ३ | बालाजी पि.रंगनाथ मोरे | वय-३३ वर्षे | धंदा-मजुरी |

सर्व रा.पानशेवडी ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ची पत्नी अर्जदार क्र.२ व ३ ची आई नामे छायाबाई रंगनाथ मोरे हे होते. ते दिनांक ०७/१२/२०२४ रोजी मौजे पानशेवडी, ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहेत. अर्जदाराचे म्हणणे आहे की छायाबाई रंगनाथ मोरे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत छायाबाई रंगनाथ मोरे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत छायाबाई रंगनाथ मोरे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-१७/१०/२०२६

आज रोजी दि.०३/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर, कंधार

स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार

## जाहीर प्रगटन

कंधार येथील जिल्हा न्यायाधीश-२ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.ए.पी.कुलकर्णी, जिल्हा न्यायाधीश-२,कंधार)
दिवाणी किरकोळ अपील क्र.३६/२०२६
संतोष वि.निरंक

अर्जदार -

१. संतोष हानमंत मुंडे, वय : ३० वर्षे, कामधंदा-शेती, २. ज्योती संतोष मुंडे, वय : २४ वर्षे, कामधंदा - घरकाम, दोन्ही रा. मुंडेवाडी, ता.कंधार जि.नांदेड

आणि

३. बाबु नारायण मुंडे, वय : ५० वर्षे, कामधंदा-शेती, ४. भारतबाई बाबु मुंडे, वय : ४४ वर्षे, कामधंदा-घरकाम, दोन्ही रा.बाभुळगाव ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार - निरंक

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ संतोष हानमंत मुंडे, २. ज्योती संतोष मुंडे, दोन्ही रा.मुंडेवाडी, ता.कंधार जि.नांदेड यांनी त्यांची मुलगी सानवी वय ३ वर्ष हिस अर्जदार क्र.३. बाबु नारायण मुंडे, व ४ भारतबाई बाबु मुंडे, दोन्ही रा.बाभुळगाव ता.कंधार जि.नांदेड यांना दत्तक देण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कलम ५६ (४) बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम अन्वये दत्तक घेण्याचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

याद्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, सदरील प्रकरणात कुणाला आक्षेप असल्यास सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहून सदरील प्रकरणात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदरील प्रकरणात कुन्हा ति-हाईत व्यक्तिचा काही एक आक्षेप नाही असे ग्राह्य धरुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरील प्रकरणाची पुढील तारीख ३०/०९/२०२६ असून त्यानंतर आलेल्या आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

आज रोजी दि.१०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
जिल्हा न्यायालय,कंधार

स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
जिल्हा न्यायालय,कंधार

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/१२४०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०७-९-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१४६१०/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की सौ.**राणी भ्र.उत्तम भोजने** रा.**तरोडा खु.नांदेड** यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०.१०.२००९ तरोडा खु. गट नं.१८९ पैकी प्लॉट क्रं.०६ चा उ भाग पिन क्र.४०६१२०४००२०** श्री. **विठ्ठल मारोती लोंढे** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.७१५० दि.२२/०७/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- २० फुट रुंद रोड आहे, **पश्चिम**-प्लॉट क्र.०७ आहे, **दक्षिण**-३० फुट रुंद रोड आहे, **उत्तर**-सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार मोहम्मद साकिब पि. हाजी अब्दुल रज्जाक कुरेशी रा. दिलीपसिंघ कॉलनी वजिराबाद, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारा वरुन सदरील जाहिर प्रगटन देण्यात येते,

हे की, सर्वे नं. १६/ब पैकी मौजे हस्सापुर नांदेड नसरतपुर हस्सापुर ग्राम पंचायत हद्दतील एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. १३ आहे ज्याची रुंदी दक्षिण-उत्तरेस ३० फुट म्हणजे ९.१४ मी. आहे ज्याची लांबी पुर्व-पश्चिम ४० चौ. फुट म्हणजेच १२.१९ मीटर आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १२०० चौ.फुट आहे. ज्याची चतुर्सिमा पुर्वेस : अब्दुल वहिद यांची जागा आहे, पश्चिमेस : प्लॉट क्र. १२ आहे, दक्षिणेस : प्लॉट क्र. ८ आहे, उत्तरेस : २० फुट रुंद रोड आहे.

आज रोजी श्री शेख मो. याकुब शेख रफिक, (हाफी साहाब) यांच्याकडून कायमस्वरुपी सौदाचिठ्ठी ताबा पावती / कायमस्वरुपी खरेदी केले असुन पुर्ण रक्कम शेख मो. याकुब यांना दिली आहे. तसेच दिनांक ०७/०९/२०२६ रोजी ताबा देण्यात आलेला आहे. परंतु काही कार्यकालीन अडचणी असल्यामुळे सदरील प्लॉटची विक्रीखत काही वेळा नंतर करुन देण्याचे ठरले आहे. वरील नमुद प्लॉट हे आमच्या पक्षकारांच्या संमती शिवाय कोणीही खरेदीखत, सौदाचिठ्ठी, विकत घेऊ नये. किंवा विकत घेण्याचा करार करु नये. केले असल्यास त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल जर कोणाला या जाहिर प्रगटना निमीत्त हस्तक्षेप किंवा हरकत असेल १५ दिवसाच्या आत संपर्क साधावा त्यानंतर आलेले कोणतेही आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही.

करीता हे जाहीर प्रगटन
मार्फत :
स्वाक्षरित/-
ॲड.मो.वाजीद शेख
रा.वकील कॉलीनी, नांदेड
मो.९०२८११७१४४

प्रगटन देणार
स्वाक्षरित/-
मोहम्मद साकिब पि.हाजी अब्दुल रज्जाक कुरेशी
रा.दिलीपसिंघ कॉलनी वजिराबाद, नांदेड मो.९३२५३५०५००

# सावरगाव मेट फाटा येथे शिवसेनेची दहीहंडी उत्साहात

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील सावरगाव मेट फाटा येथे ९ सप्टेंबर रोजी शिवसेना आणि युवा सेनेच्यावतीने आयोजित दहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास नांदेड दक्षिणचे आ.आनंद बोंढारकर, जिल्हाप्रमुख विजय गिरडे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

दहीहंडी फोडण्यासाठी चार पथकांनी सहभाग नोंदविला होता. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर दहीहंडी फोडण्याची स्पर्धा लावण्यात आली. यात नांदेड शहरातील चिखलवाडी येथील जय श्री महाकाल दहीहंडी पथकाने दहीहंडी फोडून बक्षीस मिळवण्याचा मान मिळविला. या कार्यक्रमास युवा सेनेचे जिल्हाप्रमुख विकास देशमुख, अर्धापुर तालुकाध्यक्ष संतोष कपाटे, भोकर तालुकाध्यक्ष माधव वडगावकर, सचिन किन्हाळकर, ॲड.शेखर कुंटे, नारायण पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. सदरील दहीहंडीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधव करेवाड, दर्शन डुरे, दीपक मेटकर यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. या दहीहंडीचा कार्यक्रम पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# अतिक्रमण हटताच माहूरच्या रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

## डीलिंगच्या आरोपानंतर प्रशासन आक्रमक;टपऱ्यांवर बुलडोझर,मात्र टोलेजंग अनधिकृत बांधकामांना अभय?

माहूर/प्रतिनिधी-शहरातील प्रमुख रस्ते आणि राष्ट्रीय महामार्गालगत वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांची गैरसोय दिवसेंदिवस वाढत असताना अखेर प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेला वेग दिला आहे. शुक्रवार, दि.११ रोजी झालेल्या कारवाईवरून समाजमाध्यमांवर डीलिंगचे आरोप करणारे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर प्रशासनाची मोठी धावपळ झाली. या आरोपांचा डाग पुसण्यासाठीच की काय, शनिवारी दि.१२ रोजी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करून अतिक्रमण हटाव मोहीम अधिक तीव्र करण्यात आली. कारवाईमुळे माहूरच्या रस्त्यांनी अखेर मोकळा श्वास घेतला असला, तरी टपऱ्यांवर हातोडा आणि टोलेजंग बांधकामांना संरक्षण का? हा सवाल मात्र कायम आहे.

शनिवारच्या कारवाईदरम्यान रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्या, पत्र्याचे शेड, विविध प्रकारचे अडथळे आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे साहित्य हटविण्यात आले. प्रशासनाची कारवाई सुरू होण्यापूर्वीच अनेक व्यावसायिकांनी स्वतःहून आपापल्या टपऱ्या व अतिक्रमणे हटवून सहकार्य केले. त्यामुळे रस्त्यालगतचा बराचसा भाग मोकळा झाला आणि वाहतुकीलाही काही प्रमाणात दिलासा मिळाला.



मात्र, कारवाईचा बुलडोझर सर्वांसाठी समान आहे का? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. कालपासून कायम असलेल्या काही मोठ्या पक्क्या बांधकामांबाबत प्रशासनाने कोणती भूमिका घेतली, याबाबत स्पष्टता नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः ५० फुटांच्या मर्यादेबाबत नियम असल्याची चर्चा असताना, काही टोलेजंग बांधकामांच्या पुढील भागातील टिनशेड हटवून मूळ पक्क्या बांधकामाला हात न लावल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गरीबांच्या टपऱ्या हटविणे सोपे आणि मोठ्या बांधकामांवर कारवाई करणे अवघड? असा संतप्त सवालही आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. प्रशासनाने जर अतिक्रमण हटाव मोहीम राबवायचीच असेल तर ती कोणत्याही दबावाला किंवा प्रभावाला बळी न पडता सर्वांसाठी समान असावी, अशी मागणी जोर धरत आहे.माहूर शहरातील महामार्ग, बसस्थानक परिसर तसेच प्रमुख अंतर्गत रस्त्यांवर गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले होते. रस्त्याच्या कडेला टपऱ्या, शेड, फलक आणि इतर अडथळ्यांमुळे रस्ते अरुंद झाले होते. परिणामी वाहतूक कोंडीबरोबरच पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत होते. अनेक ठिकाणी अपघाताची परिस्थिती निर्माण झाली होती.शनिवारच्या कारवाईनंतर रस्त्यांची रुंदी काही प्रमाणात पूर्ववत झाल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या धडक कारवाईचे स्वागत केले आहे. मात्र, आज हटविलेले अतिक्रमण उद्या पुन्हा उभे राहू नये, यासाठी प्रशासनाने केवळ एक-दोन दिवसांची मोहीम न राबविता कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे.रस्ते मोकळे झाले, हे स्वागतार्ह; पण कारवाईही पारदर्शक आणि समान झाली तरच प्रशासनाच्या मोहिमेवरचा संशय दूर होईल. अन्यथा, छोट्या अतिक्रमणांवर कारवाई आणि मोठ्या बांधकामांकडे दुर्लक्ष अशी प्रतिमा निर्माण झाल्यास अतिक्रमण हटाव मोहिमेच्या हेतूवरच प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता आहे.




येत्या सोमवारी गणपती बाप्पाचे आगमन होणार असून शहरातील बाजारपेठांत व्यापाऱ्यांनी गणरायांच्या लहान मूर्तीसह मोठ्या मूर्ती विक्रीसाठी आणल्या आहेत.

## खंजर बाळगणाऱ्या इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-विष्णुपुरी येथे खंजर घेवून फिरणाऱ्या एका इसमास नांदेड ग्रामीण पोलीसांनी शुक्रवारी सायंकाळी अटक केली आहे.

सतपालसिंघ जसपालसिंघ पुजारी (वय ३१) रा.विष्णुपुरी, नांदेड हा इसम एखादा गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने शुक्रवारी सायंकाळी विष्णुपुरी परिसरात फिरत होता. गस्तीवरील पोलीसाच्या पथकाने सतपालसिंघ पुजारी यास अटक करुन त्याच्या जवळील एक खंजर जप्त केला आहे. पोलीस शिपाई हणमंता कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात सतपालसिंघ पुजारी याच्या विरुध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंगणवाडी केंद्रे बालकांच्या सर्वांगीण विकासाचे माहेरघर बनावीत-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील अंगणवाडी केंद्रे केवळ पोषण आहार वाटपाचे ठिकाण न राहता बालकांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासाचे केंद्र बनावीत. यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हा बाल विकास प्रकल्प कार्यालयातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित नांदेड शहरातील शाळांच्या मुख्याध्यापकांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी कैलास तिडके, महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी प्रवीण मांदळे, जिल्हा समुपदेशक तथा शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री.कर्डिले म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील अंगणवाडी केंद्रे प्राथमिक शाळांना जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून अंगणवाडीतील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाशी जोडता येईल. बालकांचा बौद्धिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. बाल विकास प्रकल्प अधिकारी कैलास तिडके यांनी अंगणवाडी केंद्रांच्या अडचणी दूर करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. शिक्षणाधिकारी प्रवीण मांदळे यांनी अंगणवाडी केंद्रे प्राथमिक शाळांशी जोडल्यामुळे त्यांच्या जागेसह विविध सुविधा व शैक्षणिक बाबींचे प्रश्न सुटण्यास मदत होऊन बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे सुलभ होईल, असे सांगितले.शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे म्हणाले की, बालकांच्या आयुष्यातील पहिली आठ वर्षे मेंदूच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असतात. अंगणवाडीतील बालकांमध्ये मोठी गुणवत्ता असून, त्यांच्या क्षमतेला योग्य वेळी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. बैठकीच्या प्रारंभी बाल विकास प्रकल्प अधिकारी कैलास तिडके यांनी प्रास्ताविक केले. बैठकीस नांदेड शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुणबी–मराठा जात प्रमाणपत्राचा मार्ग सुकर ;किनवट तालुक्यात विशेष शिबिर

किनवट/प्रतिनिधी-कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी किनवट तालुक्यातील ९ महसूल मंडळ स्तरावर १५ व १६ सप्टेंबर रोजी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती किनवटचे प्रभारी तहसीलदार चंद्रशेखर सहारे यांनी दिली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सहाय्यक जिल्हाधिकारी बी.सरवणन यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविली जात आहे. नागरिकांना विनाविलंब व सुलभ पद्धतीने प्रमाणपत्र मिळावे हा उद्देश असल्याचे स्पष्ट केले आहे. १५ सप्टेंबर रोजी किनवट, बोधडी, जलधारा, इस्लापूर व शिवणी मंडळात तर १६ सप्टेंबर रोजी सिंदगी, दहेली, उमरी बाजार व मांडवी मंडळात सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत महसूल कार्यालयात ही शिबिरे आयोजित केली आहेत.शिबिरात जुन्या कुणबी नोंदींची पडताळणी, अर्ज स्वीकृती व कागदपत्र तपासणी करून पात्र लाभार्थ्यांना जागेवरच प्रमाणपत्र दिले जाणार आहे. नागरिकांनी ७/१२, जात विषयक पुरावा, वंशावळ, रहिवासी दाखला, आधार कार्ड सोबत आणावयाचे आहे. या शिबिरांचा जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी तहसीलदार चंद्रशेखर सहारे यांनी केले आहे.

नों.क्र.एनएनडी/एचएसजी/२०७/ऑफ/७८ दि.२०/०१/१९७८

**श्री विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,नांदेड**

जा.क्र. /२०२६ दि.११/०९/२०२६

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री. ------------------------
--------------------------
सभासद,
श्री विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,नांदेड.

सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, श्री विनायक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,नांदेड यांची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०९/२०२६ रोजी रविवार, सकाळी ११.०० वाजता, संस्थेचे अध्यक्ष अमरप्रीतसिंघ सरबजीतसिंघ जज यांच्या अध्यक्षतेखाली, संस्थेचे कार्यालय, विनायकनगर,नांदेड येथे घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

तरी सर्व सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. मागील सभेचे इतिवृत्त (प्रोसीडिंग) वाचून कायम करणे.
२. सन २०२५-२०२६ सालाचे जमाखर्च, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद वाचून मंजुरी देणे.
३. सन २०२६-२०२७ सालाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास संमती देणे.
४. कार्यकारी मंडळाच्या ठरावास मंजुरी देणे.
५. संस्थेच्या सन २०२६-२०२७ च्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
६. मा.सभाध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणाऱ्या विषयांवर विचार करणे.

सचिव
श्री विनायक सहकारी
गृहनिर्माण संस्था मर्या.,नांदेड

**विशेष सूचना :**

पोटनियम क्र.३१ अन्वये सभेची गणपूर्ती न झाल्यास सदरील सभा तहकूब करुन अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी, त्याच दिवशी सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल. त्यावेळी सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

नोट : वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर फक्त संस्थेच्या सभासदांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

# हलबा-हलबींच्या जात वैधता पुनर्विलोकनाला उच्च न्यायालयात आव्हान

## नव्या कायद्यातील तरतुदींवर आक्षेप;शासनाला उत्तर दाखल करण्यासाठी नोटीस

उमरखेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र शासनाने दि.२२ जुलै रोजी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या जात प्रमाणपत्राच्या देण्याची व पडताळणीची प्रक्रिया नियंत्रित करणाऱ्या कायद्यात केलेल्या सुधारणेतील काही तरतुदींना हलबा-हलबी समाजाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. या प्रकरणात ९ सप्टेंबर रोजी न्यायालयाने शासनाला उत्तर दाखल करण्यासाठी नोटीस बजावली आहे.

ढाणकी येथील हलबी आदिम जमात मंडळाच्या वतीने अध्यक्ष अनिल कुसरे यांनी ॲड.अश्विन देशपांडे यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात ही याचिका दाखल केली आहे.शासनाच्या नव्या सुधारणेमध्ये नियम ६-क अंतर्गत जात पडताळणी समितीला विशिष्ट परिस्थितीत यापूर्वी दिलेल्या वैधता प्रमाणपत्रांचे स्वाधिकाराने पुनर्विलोकन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. एखाद्या व्यक्तीच्या दाव्याविरोधात प्रतिकूल पुरावा आढळल्यास, रक्ताच्या नातेवाईकांनी फसवणूक किंवा महत्त्वाची तथ्ये लपवून वैधता मिळविल्याचे निदर्शनास आल्यास अथवा वैधता प्रमाणपत्र देताना महत्त्वाच्या पुराव्याकडे दुर्लक्ष किंवा चौकशीतील त्रुटी आढळल्यास समितीला पुनर्विलोकनाची तरतूद करण्यात आली आहे. या प्रक्रियेत संबंधित व्यक्तीला म्हणणे मांडण्याची संधी देणे बंधनकारक असले, तरी पुनर्विलोक-नानंतर समिती वैधता प्रमाणपत्र कायम ठेवू शकते किंवा जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र रद्द करून जप्त करण्याचा आदेश देऊ शकते.दरम्यान, नियम ६-ख नुसार पडताळणी समितीच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीला शासनाने निर्दिष्ट केलेल्या अपिल प्राधिकरणा समोर ९० दिवसांच्या आत अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. अपिल प्राधिकरणाने साधारण तीन महिन्यांत निर्णय देण्याची तरतूद असून, त्यानंतरच्या आदेशाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. या तरतुदींनाही याचिकेत आव्हान देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

> नव्या सुधारणेतील तरतुदींमुळे यापूर्वी कायदेशीर प्रक्रियेतून प्राप्त झालेल्या जात वैधता प्रमाणपत्रांच्या पुनर्विलोकनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तरतुदींची घटनात्मक वैधता व त्याचा नागरिकांच्या अधिकारांवर होणारा परिणाम याबाबत उच्च न्यायालयासमोर आमची भूमिका मांडण्यात आली आहे. न्यायालयाने शासनाला नोटीस बजावली असून,शासनाचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालय योग्य तो निर्णय घेईल.
>
> **- ॲड. अश्विन देशपांडे,**
> अधिवक्ता, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ

# कर्जमाफी यादीतील ३ हजार ३८९ लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे

देगलूर/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेअंतर्गत देगलूर तालुक्यातील पहिल्या यादीत ८५१२ लाभार्थी शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध झाली होती. त्यापैकी तब्बल ६१४५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करून कर्जमाफीचा लाभ घेतला आहे. आता दि.११ सप्टेंबर रोजी तालुक्यातील १०४ गावांमधील आणखी ३३८९ लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध झाल्या असून, यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन तहसीलदार भारत सूर्यवंशी व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर अशोक राठोड यांनी केले आहे.

यादीत नाव असलेल्या पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे. आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांनी यादीतील विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड, फार्मर आयडी व आवश्यक कागदपत्रे सोबत घेऊन जाणे आवश्यक आहे. कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे यादीत नाव असूनही केवळ प्रमाणीकरणा अभावी कोणताही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी महसूल व सहकार विभागाकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. आधार प्रमाणीकरण करताना तांत्रिक अथवा अन्य कोणतीही अडचण निर्माण झाल्यास शेतकऱ्यांनी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. यादीत नाव असलेल्या पात्र शेतकऱ्यांनी वेळ न दवडता आधार प्रमाणीकरण पूर्ण करून शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार भारत सूर्यवंशी व सहाय्यक निबंधक अशोक राठोड यांनी केले आहे.अडचण आल्यास सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, देगलूर येथे संपर्क साधावा.

# पाच वर्षांच्या मुलासह महिला बेपत्ता


## किनवट बसस्थानक परिसरातील घटना

किनवट/प्रतिनिधी-किनवट बसस्टँड परिसरातून एक २५ वर्षीय महिला तिच्या ५ वर्षांच्या मुलासह बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. तिच्या वडिलांनी किनवट पोलीसात दिलेल्या तक्रारीवरुन हरवल्याची नोंद घेण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार सी.के.मुंडे पुढील तपास करीत आहेत.

गणेश दादाराव सोळंके (वय ४९, रा.मंडकी, ता. माहूर) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी सौ.सुजाता अजय चव्हाण (वय २५,रा.भुरबुशी, ता.भोकर) ही तिचा मुलगा गुड्डू उर्फ हर्ष अजय चव्हाण (वय ५ वर्षे) याच्यासह किनवट बसस्टँड समोरून आजीकडे मुलाला खाऊ घेऊन देते, असे सांगून गेली. मात्र, त्यानंतर ती परत आलीच नाही. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला असता ती आढळून आली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार सी.के.मुंडे करीत आहेत. सदर महिला किंवा मुलगा यांच्याबाबत कोणालाही काही माहिती मिळाल्यास अथवा हे दोघे दिसून आल्यास तातडीने तपास अधिकारी सी.के.मुंडे (मो.क्र.९४०३३३००३०) किंवा किनवट पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## अनुसयाबाई कावळे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-जेष्ठ महिला अनुसयाबाई सुदामराव कावळे (वय ८२) रा.श्रावस्तीनगर, नांदेड यांचे आज शनिवार दि.१२ सप्टेबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती सुदामराव कावळे, पाच मुले, दोन मुली, नातू-नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर रविवार दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता मोक्षधाम भूमी, गोवर्धनघाट नांदेड येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहे.



# उमरखेडमध्ये पावसासाठी ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का

उमरखेड/प्रतिनिधी-गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी आणि नागरिक चिंतेत आहेत. याच पार्श्वभूमीवर पावसासाठी अल्लाहकडे प्रार्थना करण्यासाठी शुक्रवार दि.११ सप्टेंबर रोजी उमरखेडच्या ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का अदा करण्यात आली.

या वेळी शहरातील सर्व मशिदींचे इमाम, ज्येष्ठ नागरिक, तरुण आणि लहान मुलांसह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते. नमाजनंतर सामूहिक दुआ करण्यात आली.हे अल्लाह! आम्हाला फायदेशीर, उपयुक्त आणि निरुपद्रवी पाऊस दे. तुझ्या सेवकांना आणि जनावरांना पाणी दे, तुझी दया वाढव आणि तुझ्या मृत जमिनीला पुन्हा जिवंत कर.नमाज-ए-इस्तिस्का ही पावसासाठी अल्लाहकडे मागितली जाणारी विशेष नमाज आहे. ही ईदच्या नमाजाप्रमाणे मोकळ्या मैदानात अदा केली जाते. यात अजान-इकामत शिवाय दोन रकअत, खुतबा, पश्चात्ताप, आणि परिस्थिती बदलण्याचे प्रतीक म्हणून चादर पलटणे आणि उलट्या हाताने दुआ करणे अशा विशेष बाबी केल्या जातात.पावसाअभावी शेती, पिके, जनावरे आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी या अल्लाह, आपल्या रहमतीचा पाऊस बरसव आणि उमरखेडसह संपूर्ण राज्यात सुख-समृद्धी दे अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४